सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र. १८/का.५

निवडणूक तात्काळ

नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २/२/२०१२

प्रति,
महानगरपालिका आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती, नागपूर,
सांगली-मिरज-कुपवाड व औरंगाबाद.

विषय :- महानगरपालिका सार्वत्रिक / पोटनिवडणुका- २०१२
नामनिर्देशनपत्राच्या छाननीबाबत...

संदर्भ:- १. राज्य निवडणूक आयोगाची समक्रमांकाची
दिनांक-३१/१/२०१२, १/२/२०१२, २/२/२०१२ ची पत्र
२. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक-१/२/२०१२
चे २ स्वतंत्र आदेश

महोदय,

महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्रमांक-८५३/२०१२ व अन्य याचिकांवर न्यायालयाने दिनांक- ३१/१/२०१२ रोजी एकत्रित आदेश पारित केले. या प्रकरणामध्ये त्यानंतर दाखल झालेल्या सिव्हिल ॲप्लिकेशन क्रमांक-२८८/२०१२ व अन्य एका सिव्हिल ॲप्लिकेशनमध्ये उच्च न्यायालयाने दिनांक- १/२/२०१२ रोजी एकत्रित आदेश पारित केले. या आदेशानुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने छाननीच्यावेळी मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेली जात वैधता प्रमाणपत्र ही दक्षता समितीचा अहवाल प्राप्त करून देण्यात आली होती किंवा कसे याची तपासणी करून निर्णय देणे आवश्यक होते. म्हणून

यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने संदर्भांकित दिनांक- ३१/१/२०१२, १/२/२०१२, २/२/२०१२ च्या पत्रान्वये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी छाननीच्यावेळी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच उमेदवाराकडून घ्यावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुनाही विहित करण्यात आला आहे.

तसेच संदर्भांकित दिनांक- १/२/२०१२ च्या २ स्वतंत्र आदेशान्वये नामनिर्देशनपत्रांची छाननी करणे, उमेदवारी मागे घेणे तसेच चिन्ह वाटप याबाबतचा सुधारित कार्यक्रम देण्यात आलेला आहे.

तथापि उच्च न्यायालयाने उपरोक्त रिट याचिकांमध्ये दिलेल्या निर्णयाविरूध्द महाराष्ट्र शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (सिव्हील) क्रमांक ४५९२/२०१२ दाखल केली असून या याचिकेमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिनांक- २/२/२०१२ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये उच्च न्यायालयाने जात वैधता प्रमाणपत्राची तपासणी/ छाननी करण्या संदर्भात निवडणूक निर्णय अधिका-यांना दिलेल्या निर्देशांना स्थगिती दिलेली आहे.

**वरील परिस्थितीत मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांच्या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यासंदर्भात आयोगाने संदर्भांकित दिनांक- ३१/१/२०१२, १/२/२०१२, २/२/२०१२ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचना मागे घेण्यात येत आहेत. त्यामुळे संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आता नामनिर्देशनपत्रांची छाननी नेहमीच्या पध्दतीनुसार/नियमानुसार करावी.**

**आयोगाच्या संदर्भांकींत दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१२ च्या सुधारीत कार्यक्रमानुसार मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागासाठी निवडणूक लढविणा-या उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१२ रोजी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१२ रोजी करावयाची आहे.**

**दिनांक ६ फेब्रुवारी, २०१२ रोजी निवडणूक चिन्ह नेमून देण्याची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.**

**त्यानंतर पुढील निवडणुकीच्या टप्प्यांचा कार्यक्रम म्हणजेच मतदान केंद्रनिहाय मतदारांची यादी प्रसिध्द करणे तसेच निवडणूकीसाठीचे मतदान दिनांक १६ फेब्रुवारी, २०१२ ला घेणे हे सगळे टप्पे पूर्वी दिनांक ०३ जानेवारी, २०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसारच पार पाडावयाचे आहेत.**

**उपरोक्त सूचना सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना तात्काळ कळविण्यात याव्यात असे आपणास मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार कळविण्यात येत आहे.**

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र